मुख्य अभियंता कार्यालय
मलनि:सारण विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र.८८६०/१४१८
दिनांक : २८/१०/२०२६

कार्यालयीन आदेश

विषय : ठेकेदार मे. शुभम अशोक खतोडे यांचा काळया यादीत समावेश करणेबाबत.

संदर्भ :
१) निविदा क्र. PMC/DRAINAGE/2025/237
२) कार्यादेश क्र.१८५ दि.११/०३/२०२६
३) दि.१७/०१०/२०२६ रोजी चित्रा थेटर येथे झालेली दुर्घटना.
४) मलनि:सारण देखभाल दुरुस्ती विभागाकडील करणे दाखवा नोटीस जा.क्र.१८१९ दि.१८/१०/२०२६
५) मे.शुभम अशोक खातोडे यांनी सदर केलेला खुलासा आ.क्र.१२५७ दि.२१/१०/२०२७
६) मा.महापालिका आयुक्त यांजकडेस झालेली सुनावणी दि.२६/१०/२०२६
७) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.6/582 दि.२९/१०/२०२६

मास्टर प्लॅन नुसार कल्याणी नगर सिवेज डिस्ट्रीक (SD-12) अंतर्गत देवकर चौक ते राजीव गांधीनगर ते एअर फोर्स कंपाउंड वॉल, सी.सी.डी. चौक ते कोणार्कनगर, एच.सी.एम.टी.आर. रस्ता ते ओंकउड सोसायटी मागे साकोरेनगर पर्यंत, पर्णकुटी चौक ते मदर तेरेसा नगरपर्यंत, येरवडा वांजळे वखार ते तलेसरा हॉल पर्यंत या ठिकाणच्या जुन्या जीर्ण अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलून मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणे. (निविदा क्र. PMC/DRAINAGE/2025/237) या कामाची निविदा वरील संदर्भ क्र.१ अन्वये मलनि:सारण देखभाल दुरुस्ती विभागामार्फत काढण्यात आली होती. प्रस्तुत निविदा ठेकेदार मे. शुभम अशोक खतोडे यांनी या कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने भरली होती. या निविदा प्रस्तावा संदर्भात ठेकेदार मे. शुभम अशोक खतोडे यांना संदर्भ क्र.२ अन्वये वर्क ऑर्डर देण्यात आलेली होती. सदर काम करीत असताना ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे चित्रा थेटर येथे दि.१७/१०/२०२६ रोजी प्रदीप लक्ष्मण परदेशी वय ६९ राहणार खराडी ,पुणे यांचे ड्रेनेज लाईन साठी केलेल्या खड्यात रिक्षाने धडक देऊन पडल्याने मृत्य झालेला आहे. सदर बाबत संदर्भ क्र.४ अन्वये ठेकेदाराम करणे दाखवा नोटीस दिली असता ठेकेदाराने संदर्भ क्र.५ अन्वये दिलेला खुलासा व संदर्भ क्र.६ अन्वये मा.महापालिका आयुक्त यांजकडे झालेल्या सुनावणी दरम्यान ठेकेदार याने केलेला खुलासा समाधान कारक नसल्याने मा.महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र.७ अन्वये मे.शुभम अशोक खातोडे यांना काळया यादीत समावेश करण्याचे आदेश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर ठेकेदार मे.शुभम अशोक खातोडे यांना पुणे महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयाकडील (पथ, भवन, मलनिःसारण, पाणीपुरवठा इ.) पुढील कामांकरीता मा. महापालिका आयुक्त यांचे संदर्भ क्र.७ चे ठरावांनुसार या कार्यालयीन आदेशाचे दिनांकापासून बंदी घालण्यात येत आहे.

तरी याबाबत सर्व संबंधित मा. खातेप्रमुख / विभाग प्रमुख यांनी नोंद घ्यावी.

कळावे,

खाते प्रमुख
मलनिःसारण विभाग
पुणे महानगरपालिका

SW

29/10/26

प्रत : -

१) मा.सर्व खाते प्रमुख
२) मा.उप आयुक्त झोन क्र. १ ते ५
३) मा.महापालिका सहाय्यक आयुक्त १ ते १५
पुणे महानगरपालिका

प्रति,
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ/ज/वि)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव सविनय सादर ....